# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/ 06 /2026**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक २९/०१/२०२६**

**गोल्ड ट्रेडिंग मधुन आर्थिक फायदा मिळवुन देण्याचे प्रलोभन दाखवुन फसवणुक करणाऱ्या आरोपीस सायबर पोलीस ठाणे यांनी केली अटक**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, गुन्हे शाखा यांनी जास्तीत जास्त सायबर गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक ०३/०२/२०२५ ते दिनांक २२/११/२०२५ रोजीचे कालावधीत गोल्ड ट्रेडिंगचे गुंतवणुकीमध्ये जास्तीचा फायदा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपीने वेगवेगळी बॅक खात्यावर गुंतवणुकीकरिता रक्कम पाठविण्यास सांगुन एकुण रू. ४,००,२३,६३०/- ची फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली. याबाबत सायबर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ०५/२०२६ बी.एन. एस. कलम ३१९(२), ३१८(४), ३(५) सह आय.टी. ॲक्ट कलम ६६ (डी) अन्वये अनोळखी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादी यांनी फसवणुकीची रक्कम ज्या बॅक खात्यामध्ये पाठविलेली होती ती सर्व बॅक खाते गोठविली. गुन्हयात वापरलेले बॅक खाते व मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करून संशयीत आरोपीचे वास्तव चंदणवाडी, ठाणे असल्याची माहिती प्राप्त झाली. तपास पथकाने सदर परिसरात आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. आरोपी कल्पेश कमळाकर शितप, वय ४७ वर्षे याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २८/०१/२०२६ रोजी अटक केली. सदर आरोपीचा देशातील १७ राज्यामधील सायबर तक्रारी मध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने त्याचे साथीदारासोबत वेगवेगळया बॅकेमध्ये खाते उघडलेले असल्याचे तसेच सदर खाते हे फसवणुक करण्यासाठी वापरले जात असल्याची माहिती दिलेली आहे. अटक आरोपीची दिनांक ३०/०१/२०२६ रोजी पावेतो पोलीस कस्टडी मंजुर आहे. पुढील तपास सायबर पोलीस ठाणेकडुन सुरू आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, आ.गु.शा./सायबर, श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे वपोनि विशाल पाटील, पोनि गणेश जाधव, सपोनि विवेक भोईर, स.फौ. विजय आयरे, पो.ह. अप्लेश पाटील, पो.ना. मंगेश गायकवाड, पो.शि. जयेश जमदाडे यांनी केलेली आहे.

---------------00000----------------